# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

दिनांक - १५ डिसेंबर १५

प्रती,

**मा.उप आयुक्त,**
के पश्चिम प्रभाग
बृहन्मुंबई महानगर पालिका

विषय : सरदार वल्लभभाई पटेल म्हाडा वसाहतीमधील भूखंड क्र १३७४/ब ४१७ वरील गोल्डन सेन्ड इमारतीमधील आरक्षित महानगर पालिका जागेत दिलेला "रात्र निवारा" रद्द करण्याबाबत निवेदन

महोदय ,

उपरोक्त विषयास अनुसरून सदर असोसिअशन आपल्या दप्तरी निवेदन दाखल करीत आहे. केंद्रीय नगर विकास खात्यातर्फे निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार सर्व महानगर पालिकांनी आपल्या कार्यक्षेत्रात दुर्बल निराधार घटकांसाठी रात्र निवारे उभारणे अनिवार्य करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी व समान नागरी सुविधा तळातील घटकास उपलब्ध करून देण्याचा हा स्तुत्य प्रयत्न आहे. सदर रात्र निवारे उपलब्ध करून देण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वेही आखून देण्यात आली आहेत. त्यानुसार सार्वजनिक ठिकाणे, रेल्वे स्थानके, बस स्थानके व तत्सम ठिकाणांना प्राधान्य देण्यात आले आहे.

आपल्या प्रभागातील सरदार वल्लभभाई पटेल नगर म्हाडा वसाहतीमध्ये उपरोक्त ठिकाणी "रात्र निवारा" वितरीत करण्यात आल्याचे समजते. सदर वसाहतीमधील हे ठिकाण "रात्र निवारा" करिता कितपत योग्य आहे अशी शंका निर्माण होण्यासारखी अनेक कारणे देता येतील. रात्र निवार्यातून प्रामुख्याने बेघर व्यक्तींना, वातसरुना थंडी पावसाळ्यात तसेच बाहेरील शहरातून आलेल्या व्यक्तींना रात्री विसावा मिळावा असा हेतू अभिप्रेत असतो.

सदर वसाहतीपासून अंधेरी रेल्वे स्थानक ,अंधेरी बस स्थानक तसेच वर्सोवा मेट्रो स्थानक हे बर्यापैकी दूर आहे. तसेच सदर वस्तीमध्ये प्रामुख्याने नागरी घरे बहुसंख्येने असून कार्यालयीन किंवा औद्योगिक घटक अतिशय कमी आहेत. परिणामी सदर "रात्र निवारा" कितपत उद्देशपूर्ती करेल याची शंका येण्यास फार वाव आहे.

महत्वाचे म्हणजे सदर नियोजित ठिकाणास खेटून एक शिवालय असून नगरातील बहुसंख्य जनतेचे ते आस्थेचे प्रतिक आहे. सध्याची परिस्तिथी पाहता भर वस्तीतील ह्या नियोजित "रात्र निवारा" आडून समाजकतकांकडून रात्री राहण्याच्या बहाण्याने सामाजिक सौहार्द मिटविण्याकरिता घातपाती कारवाई मंदिर ठिकाणी होण्याची भीती नाकारता येत नाही.

पुढे पहा...

प्लॉट नं.७८/ बी-१४, व.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.
www.svpnrwa.in

Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एम.डी.




परिणामी वसाहतीमधील नागरिकांच्या "रात्र निवारा" विरोधातील तीव्र भावना ह्या निवेदनाद्वारे आम्ही आपण पर्यंत पोहोचावीत असून सदर "रात्र निवारा" आपण रद्द करावा अशी आपणास विनंती करीत आहोत. तसे न झाल्यास वसाहतीमधील नागरिकांच्या तीव्र विरोधास आपणास सामोरे जावे लागेल असे खेदाने नमूद करावेसे वाटते.

सदर प्रकरणाचे गांभीर्य ओळखून "रात्र निवारा" आपण रद्द करून संबंधितास तसे निर्देश द्यावेत.

कळावे,

आपले विश्वासू,

स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |

**प्रत रवाना:**

मा. श्री शैलेश (यशोधर) फणसे,
शिवसेना नगरसेवक,
अध्यक्ष,स्थायी समिती,
बृहन्मुंबई महानगर पालिका.



Scanned with CamScanner

O/c

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१२६६/२०१२/जी बी बी एस डी

दिनांक - १५ डिसेंबर १५

प्रती,

**मा. श्री शैलेश (यशोधर) फणसे ,**
शिवसेना नगरसेवक,
अध्यक्ष,स्थायी समिती,
बृहन्मुंबई महानगर पालिका.

विषय : सरदार वल्लभभाई पटेल म्हाडा वसाहतीमधील भूखंड क्र १३७४/ब ४१७ वरील गोल्डन सेन्ड इमारतीमधील आरक्षित महानगर पालिका जागेत दिलेला "रात्र निवारा" रद्द करण्याबाबत निवेदन

महोदय ,

उपरोक्त विषयास अनुसरून सदर असोसिअशन आपल्या दप्तरी निवेदन दाखल करीत आहे. केंद्रीय नगर विकास खात्यातर्फे निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार सर्व महानगर पालिकांनी आपल्या कार्यक्षेत्रात दुर्बल निराधार घटकांसाठी रात्र निवारे उभारणे अनिवार्य करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी व समान नागरी सुविधा तळातील घटकास उपलब्ध करून देण्याचा हा स्तुत्य प्रयत्न आहे. सदर रात्र निवारे उपलब्ध करून देण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वेही आखून देण्यात आली आहेत. त्यानुसार सार्वजनिक ठिकाणे, रेल्वे स्थानके, बस स्थानके व तत्सम ठिकाणांना प्राधान्य देण्यात आले आहे.

आपल्या प्रभागातील सरदार वल्लभभाई पटेल नगर म्हाडा वसाहतीमध्ये उपरोक्त ठिकाणी "रात्र निवारा" वितरीत करण्यात आल्याचे समजते. सदर वसाहतीमधील हे ठिकाण "रात्र निवारा" करिता कितपत योग्य आहे अशी शंका निर्माण होण्यासारखी अनेक कारणे देता येतील. रात्र निवार्यातून प्रामुख्याने बेघर व्यक्तींना, वातसरुना थंडी पावसाळ्यात तसेच बाहेरील शहरातून आलेल्या व्यक्तींना रात्री विसावा मिळावा असा हेतू अभिप्रेत असतो.

सदर वसाहतीपासून अंधेरी रेल्वे स्थानक ,अंधेरी बस स्थानक तसेच वर्सोवा मेट्रो स्थानक हे बर्यापैकी दूर आहे. तसेच सदर वस्तीमध्ये प्रामुख्याने नागरी घरे बहुसंख्येने असून कार्यालयीन किंवा औद्योगिक घटक अतिशय कमी आहेत. परिणामी सदर "रात्र निवारा" कितपत उद्देशपूर्ती करेल याची शंका येण्यास फार वाव आहे.

महत्वाचे म्हणजे सदर नियोजित ठिकाणास खेटून एक शिवालय असून नगरातील बहुसंख्य जनतेचे ते आस्थेचे प्रतिक आहे. सध्याची परिस्तिथी पाहता भर वस्तीतील ह्या नियोजित "रात्र निवारा" आडून समाजकतकांकडून रात्री राहण्याच्या बहाण्याने सामाजिक सौहार्द मिटविण्याकरिता घातपाती कारवाई मंदिर ठिकाणी होण्याची भीती नाकारता येत नाही.

पुढे पहा...

फ्लॉट नं.७८/बी-१४, व.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.
www.svpnrwa.in

Scanned with CamScanner

सरदार वल्लभभाई पटेल नगर
रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन
नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.



परिणामी वसाहतीमधील नागरिकांच्या "रात्र निवारा" विरोधातील तीव्र भावना ह्या निवेदनाद्वारे आम्ही आपण पर्यंत पोहोचावीत असून सदर "रात्र निवारा" आपण रद्द करावा अशी आपणास विनंती करीत आहोत. तसे न झाल्यास वसाहतीमधील नागरिकांच्या तीव्र विरोधास आपणास सामोरे जावे लागेल असे खेदाने नमूद करावेसे वाटते.

सदर प्रकरणाचे गांभीर्य ओळखून "रात्र निवारा" आपण रद्द करून संबंधितास तसे निर्देश द्यावेत.

कळावे,

आपले विश्वासू,

**स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन**

| | | |
|---|---|---|
| **आनंद जाधव** | **सुर्यकांत ननावरे** | **अनिल परदेशी** |
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| **(अध्यक्ष)** | **(सचिव)** | **(खजिनदार)** |

**प्रत रवाना:**

मा.उप आयुक्त,
के पश्चिम प्रभाग
बृहन्मुंबई महानगर पालिका

प्लॉट नं.७८/बी-१४, व.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.
www.svpnrwa.in

Scanned with CamScanner